# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## दिनांक २७/०३/२०२४ (बुधवार) सायंकाळ

---

### बकरी चोरीचे गुन्हयातील आरोपी नागपूर ग्रामीण पोलीसांच्या जाळयात

दि. २६/०३/२०२४ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक सावनेर उपविभागात प्रोव्हीशन तसेच जुगार रेड कामी पेट्रोलींग करीत असतांना सावनेर ते केळवद रोड वरील सावनेर ते पांढुर्णा उडानपुलचे खाली एक जुनी वापरती निळया रंगाची वर्णा चार चाकी कार क्र. एम.एच ०२ ए.वाय. ००४३ हि संशयीतरित्या दिसुन आली. त्या गाडीला स्टाफचे मदतीने घेराव टाकुन वर्णा कार चालकास ताब्यात घेउन त्याचे नाव, गाव विचारले असता त्यांनी आपले नाव **सोहेल महेबुब शाह, वय २१ वर्ष, रा. वार्ड क्र. १४ चिचपुरा सावनेर ता. सावनेर ह. मु. फातमा मस्जित जवळ, पीली नदी. यशोधर नगर नागपुर** असे सांगीतले. त्याचे ताब्यात असलेली निळया रंगाचे होन्डाई वर्णा कार क्र. एम.एच ०२ ए.वाय. ००४३ ची पाहणी केली असता गाडीचे मागचे सिट वर तसेच डिक्कीमध्ये बकरीचे केस तसेच बकरीच्या लेंडया दिसुन आल्या. ताब्यात घेतलेला इसम नामे सोहेल शाह यास विश्वासात घेउन विचारपुस केली असता त्याने फरार आरोपी नामे तोहसीफ रा. मोमीनपुरा, नागपुर याला सोबत घेउन खालील प्रमाणे गुन्हा केल्याचे कबुल केले.

पो. स्टे केळवद येथील १) अप. क्रं. १०७/२४० कलम ३७९ IPC २) अप, क्रं. १२५/२४ कलम ३७९ IPC
पो स्टे खापा ३) अप. क्रं. २४/२४ कलम ३५७, ४८० IPC

तसेच चोरी केलेला मुद्देमाल हा युसुफ रा. कलमना नागपूर यास विक्री केल्याचे सांगितले. आरोपीच्या ताब्यातून १) नगदी १७,०००/—रू २) २ अँड्रॉइड मोबाईल १०,०००/—रू. ३) जुनी वापरती होंडाई वर्णा कार क्रं, कार क्र. एम.एच ०२ ए.वाय. ००४३ किंमती २,००,०००/—रू. असा एकूण २,२७,०००/— रु चा मुद्देमाल जप्त केला आहे. जप्त मुद्देमाल व आरोपीस वैदयकिय तपासणी करून पुढील कायदेशीर प्रक्रिये करीता पोलीस ठाणे केळवद यांचे ताब्यात देण्यात आले.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक ओमप्रकाश कोकाटे, सपोनी किशोर शेलकी, पोहवा राजू रेवतकर, रोशन काळे, विरेंद्र नरड, विपीन गायधने, शंकर मडावी, उमेश फुलबेल, पो.हवा किशोर वानखेडे, आशिष मुंगळे स्था गु शा ना. ग्रा यांनी पार पाडली.




## अवैध रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध गुन्हा नोंद
## नागपूर ग्रामीण पोलीसांची कारवाई

दिनांक २७/०३/२०२४ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक उमरेड उपविभागात पेट्रोलिंग करीत असता गोपनीय सूत्रधाराकडून माहीती मिळाली की, पोलीस स्टेशन भिवापूर हद्दीत भिवापूर ते नागपूर रोडनी एक ट्रॅक्टर संलग्न ट्राली मध्ये अवैद्यरित्या विनापरवाना रेतीची चोरटी वाहतूक होत आहे. अशा मिळालेल्या माहिती वरून नमुद घटनास्थळी नाकाबंदी केली असता ट्रॅक्टर क्र. MH 40 CA 0749 संलग्न बिना नंबर ची ट्रॉली चा **चालक आरोपी नामे— कैलाश करुजी गोंगल वय ४८ रा. ग्रा. पं. जवळ नीलज जि. भंडारा व फरार मिर्जा नाजीम बेग रा. भिवापूर** हे आपले ताब्यातील वाहनात अंदाजे ०१ ब्रास रेती अवैधरीत्या विनापरवाना वाहतूक करतांना मिळून आल्याने सदर ट्रॅक्टर ट्रॉली चालकास ट्रॅक्टर मधील रेतीचे रॉयल्टी बाबत विचारले असता रॉयल्टी नसल्याचे सांगितल्याने व सदरची रेती ही चोरीची असल्याची खात्री झाल्याने आरोपीच्या ताब्यातून १) ट्रॅक्टर MH 40 CA 0749 किंमती ५००,०००/—रू. २) बिना नंबर ची ट्रॉली १,००,०००/— रु ३) एक ब्रास रेती किमती ६००० /—रू असा एकूण ६०६,०००/— रूपयाचा मुद्देमाल जप्त करून आरोपी हे विनापरवाना रेती चोरी करून वाहतूक करताना मिळून आले.

जप्त मुद्देमाल व कागदपत्रे पुढील कायदेशीर प्रक्रिये करीता पोलीस ठाणे भिवापूर यांचे ताब्यात देवून आरोपीं विरूद्ध कलम ३७९, १०९ भादवी सहकलम ४८(८) महसूल अधिनियम अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक ओमप्रकाश कोकाटे PSI आशिष मोरखडे, HC अरविंद भगत, HC गजेंद्र चौधरी, PC राकेश तालेवर, DPC आशुतोष लांजेवार यांनी पार पाडली.

## पो.स्टे. जलालखेडा हद्दीत जुगार अड्डयावर धाड

### —: नागपुर ग्रामीण पोलीसांची कारवाई :—

दिनांक २६/०३/२०२४ रोजी जलालखेडा पोलीस स्टेशनचे ठाणेदार सपोनि सी. बी. चौहान, PSI मनोज शेंडे , पोलीस अंमलदार निलेश खेरडे, आशिष हिरूळकर, शिवदास सौंदळे, पोलीस स्टेशन परिसरात लोकसभा सार्वत्रिक निवडणुक — २०२४ संबंधाने पेट्रोलिंग करित असता गोपनिय माहीती मिळाली की, उमठा शेत शिवारात काही ईसम जुगार खेळ खेळत आहे. अशा माहीती वरून सदर घटनास्थळी लपत छपत जावून धाड टाकली असता, घटनास्थळी १) रूपेश हरिभाऊ गिरी वय २७ वर्ष रा. मेंढला २) त्रिरेन अशोकराव हाके वय २८ वर्ष रा. मेंढला. यांचे अंगझडतीमध्ये व झाडावर ठेवलेले ११३०/— रू. व घटनास्थळावरून ०२ मोटार सायकल किंमती ९५०००/— रूपये एकुण किंमती ९६१३०/— रूपयाचा माल पंचासमक्ष घटनास्थळावरून मिळुन आला. तसेच सदर घटनास्थळावरून फरार झालेले १) छत्रपती रामहरी चरपे २) विनोद तुकाराम सातपुते दोन्ही राहणार मेंढला व ईतर ०३ ते ०४ ईसम घटनास्थळावरून पळुन गेले. जुगार कायद्यांतर्गत गुन्हा नोंद करून पुढील तपास ठाणेदार सपोनि. सी.बी. चौहान यांचे मार्गदशर्नात निलेश खेरडे व शिवदास सौंदळे हे करित आहे.

सदरची कार्यवाही मा. श्री. हर्ष. ए. पोद्दार (पोलीस अधिक्षक सा. (नागपूर ग्रा), मा. अपर पोलीस अधिक्षक सा. रमेश धुमाळ, मा. उपविभागीय पोलीस अधि. सा. (काटोल वि. काटोल) यांचे मार्गदर्शनात जलालखेडा पोलीस स्टेशनचे ठाणेदार सपोनि. सी.बी. चौहान व त्यांच्या पथकाने केली.

**पोलीस माहिती कक्ष**

**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**